**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१५/०८/२०२६

*वसई विरार शहर महानगरपालिकेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा*
*घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत विविध कार्यक्रम संपन्न*

आज दि.१५ ऑगस्ट, २०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय तसेच सर्व प्रभाग समिती कार्यालये येथे “स्वातंत्र्य दिन” मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. महानगरपालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात सुरुवातीस राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम्’ चे गायन करण्यात आले यानंतर मा.महापौर महोदय श्री.अजीव पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांमार्फत राष्ट्रध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीताचे गायन करण्यात आले तसेच प्रतिज्ञा घेण्यात आली.
महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमास मा.आमदार श्री.राजन नाईक, मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.), मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, मा.माजी आमदार श्री.हितेंद्र ठाकूर, मा.माजी आमदार श्री.क्षितीज ठाकूर, मा.प्रथम महापौर श्री.राजीव पाटील, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, मा.नगरसेवक-नगरसेविका, मा.माजी नगरसेवक व माजी नगरसेविका, मा.माजी पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पोलीस विभागातील कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी, पत्रकार, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते.
याप्रसंगी नागरिकांना संबोधताना मा.महापौर महोदयांनी सर्वप्रथम सर्व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत देशातील थोर हुतात्म्यांचे, महापुरुषांचे तसेच स्वातंत्र्य सैनिकांचे, क्रांतिकारकांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करीत आपल्या भाषणास सुरुवात केली. महानगरपालिकेच्या मागील ६ वर्षाच्या प्रशासकीय काळानंतर निवडणुका होऊन लोकप्रतिनिधी नगरसेवक म्हणून विराजमान झाले त्यावेळी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विस्कटली होती, अशा परिस्थितीत तत्कालीन आमदार श्री.हितेंद्र ठाकूर, श्री.क्षितीज ठाकूर व श्री.राजेश पाटील महोदयांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस तसेच मा.उप-मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे व दिवंगत मा.उप-मुख्यमंत्री अजितदादा पवार महोदयांशी महानगरपालिकेच्या परिस्थिती बाबत चर्चा केली. मा.मुख्यमंत्री व उप-मुख्यमंत्री महोदयांनी वसई विरार शहर महानगरपालिकेला लागणाऱ्या निधीमध्ये कमतरता पडणार नाही असे आश्वासन दिले.
चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेने नागरिकांच्या, लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये सक्षम वाहतूक आणि पायाभूत सुविधेसाठी तसेच वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी MMRDA मार्फत १०७९ कोटींचे ०७ नवीन उड्डाणपूल तसेच महारेल मार्फत १२५० कोटींचे ४ रेल्वे उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. शहरात ३१०७ कोटींच्या सिमेंट-काँक्रीट रस्त्यांची कामे लवकरच प्रगतीपथावर येतील. संपूर्ण शहराला जोडणारा ४० मीटरचा रिंग रोड विकासासाठी २३४३ कोटींची तरतूद प्रस्तावित असून यांस मा.मुख्यमंत्री महोदयांनी अनुमती दर्शविली आहे. याचबरोबर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येत असून दैनंदिन ६५ हजार नागरिक आपल्या परिवहन सेवेचा लाभ घेत आहेत. या सेवेत १९ हजार ज्येष्ठ नागरिकांना आणि ७ हजार विद्यार्थ्यांना मोफत प्रवास, तर महिलांना ‘अर्ध तिकीट’ योजना लागू आहे. लवकरच नव्याने १०० वातानुकुलीत (AC) ई-बसेस महानगरपालिका परिवहन सेवेत दाखल होत असल्याचे मा.महोदयांनी सांगितले.

महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना योग्य आरोग्य सेवा देण्यासाठी शहरात महानगरपालिकेची २१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ७ मोठी रुग्णालये, १५ वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ५५ आयुषमान केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. चंदनसार येथे अत्याधुनिक ट्रॉमा सेंटरचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच आणखी १० नवीन आयुषमान आरोग्य मंदिरे ही लवकरच कार्यान्वित होणार आहेत.
महानगरपालिकेच्या सोपारा रुग्णालयात पी.पी.पी.मॉडेल द्वारे एम.आर.आय. व सिटी स्कॅन सुविधा अत्यंत वाजवी दरात उपलब्ध असून विजयनगर तुळींज रुग्णालयात कार्डियाक रुग्णवाहिका सेवा सुरु करण्यात येत आहे. तसेच तुळींज, सर डी एम पेटीट, श्री जीवदानी देवी व चंदनसार रुग्णालयात समर्पित मधुमेह केअर युनिट सुरु केले जात आहे. त्याचप्रमाणे सोपारा रुग्णालयात क्षय रोग, इन्शुलेशन वॉर्ड आणि क्षय रोग रुग्णांना मोफत (फुड बास्केट) संतुलित आहार देण्याची योजना प्रस्तावित आहे.
महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी तसेच मुलींच्या लग्नासाठी अर्थ सहाय्य देण्यात येते. याशिवाय डायलिसीस उपचार अनुदान, कर्करोग ग्रस्त महिलांना मदत, अनाथ व दिव्यांग बालकांसाठी आर्थिक सहाय्य अशा १९ विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात या विभागासाठी २८ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली असून दरवर्षी सुमारे २५०० लाभार्थ्यांना याचा थेट लाभ मिळत आहे. या योजना राबविणारी वसई विरार शहर महानगरपालिका ही सर्वात पहिली महानगरपालिका आहे. याचबरोबर एकाकी जीवन जगणाऱ्या महिलांना पाणीपट्टी व घरपट्टी माफ करण्याचा पालिकेचा मानस असल्याचे मा.महापौर महोदयांनी सांगितले.
महानगरपालिकेतील प्रत्येक कुटुंबाला पाणी मिळावे यासाठी संविधानातील कलम २१ मधील मुलभूत हक्कांच्या धोरणानुसार सर्व मिळकतींना नळ जोडणी देण्याचा निर्णय दि.३० एप्रिल २०२६ रोजीच्या ठरावाद्वारे ‘सार्वजनिक नळ जोडणी धोरण’ मंजूर करण्यात आले आहे. शहराला आज ३८० MLD पाणीपुरवठा होत असून अमृत २.० योजनेद्वारे आणि नवीन जलस्त्रोतांद्वारे भविष्यातील पाण्याची गरज पूर्ण केली जाईल. अमृत २.० अभियानाअंतर्गत ४९४.११ कोटी खर्चाची पाणीपुरवठा विस्तार योजना मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे खोलासापाडा १ व २ योजनेद्वारे अतिरिक्त ६८ MLD पाण्यासाठी योजना राबविण्याकरीता प्रस्ताव मंजुरीकरीता शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सन २०१४ रोजी महानगरपालिकेने भरलेल्या १६५.२९ कोटी रुपयांमुळेच देहेरजी धरण आकारास आले असून त्या प्रकल्पातून महानगरपालिकेला १९० MLD पाणी सन २०३० पर्यंत उपलब्ध होणार आहे.
पर्यावरण संरक्षणासाठी अमृत २.० अंतर्गत नालासोपारा पूर्व येथे १०३ MLD क्षमतेचा मलानि:स्सारण प्रक्रिया प्रकल्प (STP) डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण केला जाईल. तसेच नवघर, वसई गाव, गोखीवरे, वालीव, वसई दिवाणमान, नालासोपारा पश्चिम येथे विकेंद्रीत पॉकेट STP प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे .
अमृत २.० अंतर्गत मध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी ५८० कि.मी.लांबीची जलवाहिनी व १० जलकुंभ बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये ४०० कि.मी.जलवाहिनी व ३२ उंच जलकुंभ बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे रस्ते खोदाई जास्त सहन करावी लागेल.
महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे काम या अतिवृष्टी काळात सर्व नागरिकांनी पाहिलेच आहे. या अग्निशमन सेवेला अधिक बळकटी आणण्याच्या दृष्टीने ५ नवीन रेस्क्यू बोट, डिजिटल वॉकी-टॉकी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. तसेच महामार्गाजवळ व पश्चिम भागात नवीन अग्निशमन केंद्र लवकरच होणार असल्याचे मा.महापौर महोदयांनी यावेळी सांगितले.
महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत नेहमीच प्राविण्यप्राप्त खेळाडूंना क्रीडा अनुदान देण्यात येते. नुकत्याच झालेल्या १४ व्या सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत १३७६ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. तसेच विभागामार्फत १३ व्या ‘राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन’ व जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. गोपाळकाला (दहीहंडी) उत्सवानिमित्त गोविंदा पथकातील गोविदांना महानगरपालिकेमार्फत मोफत विमा संरक्षण प्रदान करण्यात आले आहे.
पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे सखल भागात होणारी पाणी कोंडी रोखण्यासाठी ४०७ कोटींचे साठवण तलाव (Holding Ponds) उभारणे, गाळ उपशाची कामे वैज्ञानिक पद्धतीने सुरु आहे मॅग्रोज, टीवर समस्या, खारलॅड, बाबतही प्रश्न सोडविणे बाबत मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. त्याचप्रमाणे श्वान निवारा केंद्र आणि

कचरा प्रक्रियेचे नवीन प्रकल्प शहराच्या स्वच्छतेसाठी उभारले जात आहेत. यासाठी सन्माननीय सदस्य, विरोधी पक्षनेते यांचेसोबत विविध प्रकल्पांना भेटी देत आहोत.

महानगरपालिकेमार्फत पर्यटन व संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी विविध उपक्रम राबवीत असतानाच सर्व प्रभागात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभारणे, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळांना मदत करणे, दिव्यांग पार्क उभारणे, संविधान पार्क उभारणे, वैद्यकीय दवाखान्यांचे संगणकीकरण करणे, रुग्णांना मोफत जेवण व इतर सुविधा पुरविणे, मच्छीमार व शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणे, मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल तसेच पाणी पुरवठ्याच्या नवीन योजना राबविणे या बाबींकडे महानगरपालिकेने लक्ष केंद्रित केलेले आहे. याचबरोबर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणे, पाईपलाईन द्वारे गॅस, मेट्रो रेल्वे तसेच रेल्वेचे प्रश्न, रोजगार निर्मिती, कृषी विकास व कृषी महाविद्यालय, आदिवासी विकास आदींबाबत देखील काही बाबी महानगरपालिका कार्यक्षेत्राबाहेरील असल्या तरी त्याचा पाठपुरावा करून कामे करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे मा.महापौर महोदयांनी सांगितले. मुखत्वे UPSC/MPSC परीक्षा देणाऱ्या विद्यार्थांसाठी केंद्र उभारण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या कामकाजात भरीव योगदान देणारे सर्व माजी आमदार, खासदार, महापौर, उपमहापौर तसेच लोकप्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार. आम्ही आश्वासीत करतो कि मागील ६ वर्षात वसईचा थांबलेला विकास जोमाने करण्याचा आम्ही सर्व संकल्प करू. विकास प्रकल्प आणि सरकारी योजना एका बाजूला आहेत, पण ‘सुंदर, हरित आणि प्लास्टिकमुक्त वसई-विरार’ घडवणे हे नागरिकांच्या सहभागाशिवाय शक्य नाही. सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे आणि स्वच्छतेचे नियम पाळणे हीच आपली खरी देशसेवा ठरेल. चला, आजच्या या शुभदिनी आपण सर्व मिळून आपल्या शहराला अधिक प्रगत आणि समृद्ध बनवण्याचा संकल्प करूया. असे म्हणत मा.महापौर महोदयांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले व पुन्हा एकदा सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मा.महापौर महोदयांच्या भाषणानंतर सदर कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वसई विरार शहर महानगरपालिका समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग तसेच भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री दिव्यशा केंद्रामार्फत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ए’, ‘सी’ व ‘ई’ या प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी सहाय्यक उपकरणे मोफत वाटप करण्याकामी आयोजित करण्यात आलेल्या तपासणी शिबीराचे उद्घाटन मा.महापौर व मा.आयुक्त महोदयांच्या हस्ते करण्यात आले. या तपासणी शिबिरामधून पात्र ज्येष्ठ नागरीकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सहाय्यक उपकरणे मोफत देण्यात येणार आहेत.

घरोघरी तिरंगा (हर घर तिरंगा) मोहिमेअंतर्गत महानगरपालिका मुख्यालय तसेच प्रभाग समिती कार्यालयांमार्फत ही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महानगरपालिका मुख्यालयाच्या ठिकाणी अग्निशमन विभागामार्फत तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली. यावेळी मा.महापौर व मा.आयुक्त महोदायांसह इतर मान्यवर व मनपा अधिकारी उपस्थित होते. प्रभाग समिती कार्यालयांमार्फतही “तिरंगा रॅली” व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिकेतील विविध शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, मंडळे, शासकीय कार्यालये यांनीही विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करून घरोघरी तिरंगा (हर घर तिरंगा) मोहिमेत मोठा सहभाग घेतला आहे. अभियानांतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये 'वंदे मातरम्' चे सामूहिक गायन, तिरंगा प्रदर्शन, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, निबंध लेखन, चित्रकला, रांगोळी स्पर्धा वक्तृत्व व घोषवाक्य इ. स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या होत्या.